माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११९२/२४/त.क्र.६३/२५/०१**

**श्री. संजय पंडीत**
२०/१, पारेख कुंज, वल्लभ संगीत आश्रम समोर,
सायन (प) मुंबई-४०००२२

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सा.बां.) उपविभाग कुर्ला**
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४६, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कमानी, नवा पाडा,
कुर्ला पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००७०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता उत्तर मुंबई (सा.बां.)**
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४६, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कमानी, नवा पाडा,
कुर्ला पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००७०

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपविभाग अभियंता (सा.बां) उपविभाग कुर्ला यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता-२, श्री. अकाश लद्धा उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता उत्तर मुंबई (सा.बां.) अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, मूळ जोडपत्रात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री. संजय पंडीत यांनी दाखल केलेल्या कलम १८(१) अन्वये तक्रारीवर दि. २८.०८.२०२४ रोजी अपील क्र.५७६३/२५ ते ५७६५/२५ यात पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदविला असून त्यात विनामूल्य माहिती प्रदान करण्याचे निर्देशाचे अनुपालन झाले नसून संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभाग अभियंता (सा.बां) उपविभाग कुर्ला श्री. सोनार यांच्याशी वारंवार संपर्क केला असता त्यांनी कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी हे व्यक्तिशः हजर नाहीत. त्यांच्या पारिवाहीक कारणांमुळे सुट्टीवर असल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब लक्षात घेता उपरोक्त तक्रार अर्जावर त्यांच्याविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ मधील तरतुदींनुसार व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १९ (८)(ग) व कलम २० (१) अन्वये कारवाई का करण्यात येऊ नये? याचा खुलासा व्यक्तीशः हजर राहून करावा. तसेच प्राप्त आदेशाचे अनुपालन झाले किंवा कसे याबाबतीत अनुपालन अहवाल देखील व्यक्तीशः हजर राहून सादर करावा.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra